# प्रकरण - पाचवे

# भाषावार प्रांतरचना : महाराष्ट्रातील सद्यकालीन परिस्थिती

# प्रकरण पाचवे

## भाषावार प्रांतरचना : महाराष्ट्रातील सद्यकालीन परिस्थिती

**प्रस्तावना:**

१९५६ साली मुंबई हे व्दिभाषिक राज्य झाले. त्याला गुजराथी व मराठी जनतेचा विरोध होता. परिणामी मोठी आंदोलने होऊन १९६० साली व्दैभाषिक राज्याची विभागणी करून संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाले. त्यानंतर महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी प्रयत्न केला. पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, नागपूर, औरंगाबाद इ. शहरामध्ये उद्योगधंदे उभारण्यात आले. महाराष्ट्राची निर्मिती होऊन ५० वर्षे पुर्ण झाली, परंतु आजही महाराष्ट्रातील काही भागांचा विकास झाला नाही. विदर्भासारख्या विभागात दिवसागणिक कितीतरी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. आदिवासी विभागामध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. जलसिंचनाच्या सुविधा आजही विदर्भात नाहीत. अशा अनेक अडचणी महाराष्ट्रातील काही विभागामध्ये आहेत. मुख्यत: आज महाराष्ट्राच्या समोर विदर्भाच्या विकासाचा व भावनिक ऐक्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण आज ५० वर्षे झाली तरी विदर्भाच्या मनात पश्चिम महाराष्ट्रावद्दलची चीड भावना संपली नाही. त्यामूळे विकासाच्या मुद्द्यावर आज महाराष्ट्रात प्रादेशिकवाद निर्माण होऊन विदर्भवादी नेते व जनता स्वतंत्र राज्याची मागणी तीव्रतेने करीत आहे.

मुंबई हे शहर आर्थिक राजधानी असल्यामुळे उद्योगधंदयासाठी, काम करण्यासाठी लोक येथे भारताच्या अनेक कानाकोप-यामधुन येत आहेत. त्यामुळे तेथील परप्रांतीयांचे प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे मराठी व अमराठी असा संघर्ष निर्माण झाला आहे. शिवसेना व मनसे या दोन्ही पक्षांकडून मराठीच्या मुद्यावरून आदोंलन होत आहे. त्यामुळे मुंबईतील मराठी व अमराठी संघर्ष दिवसेंदिवस चिघळत चालला आहे. एकूणच मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतरही,विदर्भात आर्थिक मागासलेपणामुळे अलगतेची भावना निर्माण झाली आहे. तर मुंवईत भाषेच्या आधारावर मराठी-अमराठी संघर्ष वाढू लागला आहे. भाषावार प्रांतरचनेमुळे त्या त्या राज्याचा समतोल विकास होईल ही अपेक्षा फोल ठरल्याचेच विदर्भाच्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे.

## अ) विदर्भ :

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात विदर्भाच्या वेगळया राज्याची मागणी प्रकर्षाने पुढे आली. नागपूर, वर्धा, चांदा (चंद्रपूर) भंडारा हे चार मराठी भाषिक जिल्हे आणि व-हाडचे चार जिल्हे एकत्रित करून त्यास नागविदर्भ किंवा महाविदर्भ संबोधले गेले. महाविदर्भाचे वेगळे राज्य अस्तित्वात यावे अशी मागणी १९५० च्या दशकात श्री अणे, ब्रिजलाल बियाणी, कन्नमवार इ. नेत्यांनी केली होती, परंतु त्यांची मागणी मान्य झाली नाही. त्यानंतर १ नोव्हेंबर १९५६ रोजी व्दिभाषिक मुंबई राज्यात हे आठ जिल्हे समाविष्ट करण्यात आले. एकविसावे शतक उजाडल्यावर नागविदर्भ किंवा महाविदर्भ या शब्दांऐवजी विदर्भ असा शब्दप्रयोग केला जाऊ लागला. आज बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली हे ११ जिल्हे मिळून विदर्भ म्हटले जाते. या विदर्भाची आज वेगळया राज्याची मागणी तीव्रतेने होत आहे.

- **ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीपुर्वीच व-हाडचे चार जिल्हे मध्यप्रांतापासून वेगळे काढुन त्याचा वेगळा प्रांत बनवावा अशी मागणी होत होती. १८५३ मध्ये हैद्राबादच्या निजामाने व-हाडचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती दिला. पुढे १९०३ च्या सुधारित तहानुसार इंग्रजांनी व-हाड प्रदेश ताब्यात घेऊन त्याच्या मालकी हक्कापोटी निजामाला ब्रिटीश सरकारने सालिना २५ लाख रूपये देऊ केले. व-हाड प्रांत ब्रिटीश सरकारच्या अंमलाखाली आला तेव्हा व्हाईसरॉय कर्झन यांनी व-हाड प्रांत मध्यप्रांतास जोडला. त्याबद्दल १९०५ साली दादासाहेब खापर्डे यांनी कर्झनशाहीवर मार्मिक भाष्य करताना म्हटले, “कर्झनने केलेल्या बंगालच्या फाळणीमुळे बंगालची हानी झाली. त्याउलट कर्झनने व-हाड मध्यप्रांताला जोडल्यामुळे व-हाडचे नुकसान झाले.”[१]

१९१८ मध्ये व-हाड प्रांत अलग करण्याच्या मागणीचा विस्तार होऊन नागपूर, वर्धा, भंडारा व चांदा हे चार जिल्हे मिळून मराठी भाषिकांचा विदर्भ निर्माण करावा अशी मागणी करण्यात आली. १ ऑक्टोबर १९३८ रोजी मध्यप्रांत व व-हाडच्या विधानसभेत प्रांतातील सर्व मराठी भाषिक जिल्हयांचा महाविदर्भ नावाचा एक वेगळा प्रांत निर्माण करावा असा प्रस्ताव एकमताने पारित करण्यात आला. त्यानंतरच्या काळात विदर्भा लाच व-हाडचा प्रदेश जोडून महाविदर्भ असा प्रदेश निर्माण करण्यात यावा अशी मागणी केली जाऊ

लागली. वॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १८ ऑगस्ट १९४० रोजी वर्धा येथे 'महाविदर्भ सभेची' स्थापना करण्यात आली. त्याच्या माध्यमातुन वेगळया विदर्भाच्या मागणीची चळवळ सुरू होती. त्यामध्ये लोकनायक बापुजी अणे, वॅ.रामराव देशमुख, मारोतराव कन्नमवार इ.नेते विदर्भाची मागणी करीत होते. १९४० च्या दरम्यान महाराष्ट्र एकीकरण समिती स्थापन झाली. परंतु महाविदर्भ व महाराष्ट्र एकीकरण समिती ही दोन वेगवेगळी व्यासपीठे झाली असली तरी त्यांची मुळ भुमिका मराठी भाषिक लोक एकत्र येणे हीच होती. त्यानंतर महाविदर्भाच्या आंदोलनाने गती घेतली. "महाविदर्भ हे एक स्वयंपूर्ण स्वंयशासित राज्य होऊ शकते"[२] असे प्रतिपादन लोकनायक बापुजी अणे यांनी फाजलअली कमिशन समोर केले. फाजलअली कमिशनने विदर्भ हे स्वंयपूर्ण राज्य होऊ शकते असा निर्वाळा दिला.वास्तविकत: महाविदर्भसभेच्या स्थापनेनंतर महाविदर्भ असा वेगळा प्रांत निर्माण करणे शक्य होते.परंतू वॅ.रामराव देशमुखांमुळे ते शक्य झाले नाही.याबद्दल दि.के.वेडकरांनी १९४८ साली असे मत मांडले की, "मध्यप्रांतातुन वेगळा काढलेला महाविदर्भ प्रांत महाराष्ट्रात सामिल न राहता वेगळाच संसार थाटुन राहिल असे १९४० च्या दरम्यान महाविदर्भ सभेला शक्य होते परंतु सुरूवातीपासुन अशी सवत्या सुभ्याची भुमिका महाविदर्भाच्या पुढा-यांनी घेतलेली आढळत नाही."[३] हे सांगताना बेडेकर त्याची मिमांसाही करतात.ते म्हणतात की, मुंबई येथील संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभेचे अध्यक्षस्थानच वॅ. रामराव देशमुख या विदर्भाच्या नेत्याने स्विकारले होते व त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असे म्हटले की, "महाविदर्भ सभेचा अर्थ आम्हाला व-हाड नागपूरच्या महाराष्ट्रीयांना सर्व सलग महाराष्ट्राचे संयुक्तीकरण मान्य नाही असा जर कोणी अर्थ लावत असतील तर ती त्यांची चुक आहे असे मी बिनदिकत म्हणु शकतो."[४]

पुढे स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमाराला संपुर्ण महाराष्ट्राची एक घटक राज्याची मागणी एकत्रितपणे करण्यासाठी अकोला येथे ८ ऑगस्ट १९४७ रोजी निवडक व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली.तोच पुढे 'अकोला करार' या नावाने प्रसिध्द झाला. करार असा होता की, "संयुक्त महाराष्ट्र म्हणुन एक प्रांत राहील. त्यामध्ये मध्यप्रांत, व-हाडमधील मराठी भाषा बोलणा-या प्रदेशांचा (ज्याला सर्वसाधारणत: महाविदर्भ म्हणुन संबोधण्यात येते)व महाराष्ट्र असे उपप्रांत ठेवण्यात यावे व या उपप्रांताना अलग कायदेमंडळ व मंत्रिमंडळ असावे व काही विशिष्ट खाती त्यांच्याकडे सोपविण्यात यावीत.संबध प्रांतासाठी एक गव्हर्नर व एक डेप्युटी गव्हर्नर राहील. त्यांची निवडणुक सबंध प्रांतातर्फे होईल व संपुर्ण प्रांतासाठी एक

कायदेमंडळ राहुन विशिष्ट प्रांतीक खाती त्याच्याकडे सोपविण्यात येतील. प्रांतिक कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणावर प्रतिनिधी राहतील. उपप्रांताच्या निवडणुका अलग अलग होतील. विशिष्ट बाबींसाठी सबंध प्रांताचे खास ट्रायब्युनल राहील व उपप्रांतांची हायकोर्ट अलग राहतील. सबंध प्रांतासाठी एक पब्लिक सर्व्हिस कमिशन ही राहिल. हया कराराप्रमाणे जर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करणे अशक्यच झाले तर आमचेकडुन महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील"[५] अशी भुमिका विदर्भवादी नेत्यांनी घेतली. अशा रीतीने अकोला करारामध्ये तरतुदी करण्यात आल्या होत्या. त्या करारावर शंकरराव देव, द.वा.पोतदार, मा.श्री.अणे ,शे.कृ.वानखेडे, मा.सा.कन्नमवार, पंढरीनाथ पाटील, पं.शा. देशमुख, पुनमचंद रांका, श्रीमन्नारायण अग्रवाल, रामराव देशमुख, दा.वि.गोखले, धनंजयराव गाडगीळ, ब्रिजलाल बियाणी, गोपाळराव खेडकर ग.त्र्य. माडखोलकर, प्रमिला ओक, जी.आर.कुलकर्णी इ.नेत्यांनी सहया केल्या.

अकोला करारात विदर्भाला स्वंतत्र प्रांत व संयुक्त महाराष्ट्र स्वतंत्र ठेवण्याची तरतुदी होती. भाषावार प्रांतरचनेविषयी शिफारस करण्यासाठी १९४८ साली दार कमिशन कमिशन नेमण्यात आले. पुढे दार आयोगाने उत्तरेकडील काम संपवुन प्रत्यक्ष साक्षी घेण्यासाठी दक्षिणेकडे दौरा करण्याचे निश्चित केले. त्या दरम्यान ३0 जुलै १९४८ रोजी श्री माडखोलकर व श्री पटवर्धन यांनी लोकनायक अणे यांची मुलाखत घेतली. त्या मुलाखतीमध्ये श्री. अणे असे म्हणाले की, "संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याच्या विरूध्द मी नाही पण तो बनत असताना आज महाराष्ट्रात जी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे तीचा संसर्ग आमच्या भागाला पोचु नये अशी इच्छा आहे. त्यासाठी अकोल्यास जो ठराव झाला त्या करारानुसार व्यवस्था व्हायला पाहिजे. साधारणत: पाच वर्षेपर्यंत या उपप्रांताचा करार अमलात असावा व नंतर एक संयुक्त महाराष्ट्र प्रांत करण्याची मोकळीक असावी."[६] त्यामध्ये त्यांनी अकोला कराराचा उल्लेख करून संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ सामील करण्याची सोय असावी असें म्हटले आणि दोन वेगळया राज्याच्या मागणीचा पुनरूच्चार केला.

दार समितीने राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करता भाषावार प्रांतरचना करू नये, अशी शिफारस केली. दार समितीच्या शिफारशींना कॉंग्रेस अंतर्गतच विरोध होता. त्यामुळे समितीच्या शिफारशी न स्विकारता जयपुर अधिवेशनात J.V.P समितीची नेमणुक केली. या समितीने एकटया व-हाडचा वेगळा प्रांत होणार नाही व

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होणार नाही अशी शिफारस केली. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र होत नाही व व-हाड प्रांतही बनत नाही हे स्पष्ट झाल्यावर बॅ. रामराव देशमुख यांनी वृत्तपत्राला एक मुलाखत दिली व त्यात असे जाहीर केले की, "संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करण्याला आमचा विरोध नव्हता व नाही, पण आता जर संयुक्त महाराष्ट्र काही कारणांमुळे होणार नसेल आणि महाविदर्भही होणार नसेल तर मध्यप्रांत, व-हाडातील मराठी जनतेची अशी भूमिका आहे की मध्यप्रांत व-हाडातील सारा मराठी प्रदेश त्या प्रांतातुन काढून मुंबई राज्यात घालण्यात यावा. सर्व मराठी भाषीक जनता ही एक प्रांतिक कारभाराच्या हुकुमतीखाली एकाच प्रांतात एकत्रित करण्यात यावी याबद्दल कोणत्याही प्रकारचा मतभेद नाही."[७] असे मत मांडले. त्यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी महाराष्ट्रीय नेत्यांनी व विदर्भातील राजकीय नेत्यांनी २७ व २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर येथे बैठक घेतली व अकोला करार रद्द करून नवा करार केला. यालाच नागपूर करार असे म्हणतात. नागपूर करारानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात निधी, नोक-या इ. ची समान वाटणी करावी, व्यवसाय, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी करण्यात याव्यात आणि सरकारी नोक-यात आरक्षण असावे अशा तरतुदी केल्या होत्या. १९५६ पर्यंत नागपूर ही मध्यप्रदेशाची राजधानी होती. त्यानंतर राज्यपुर्नरचना कायद्यानुसार विदर्भाचा समावेश प्रथम व्दैभाषिक मुंबई राज्यात करण्यात आला आणि १९६० नंतर महाराष्ट्रात करण्यात आला. अशा रीतीने भाषावार प्रांतरचनेनुसार स्वंतत्र विदर्भाच्या मागणीस डावलून विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश करण्यात आला.

**नागपूर करारातील तरतुदी :**

रा.कृ.पाटील, नानासाहेब कुंटे आणि यशवंतराव चव्हाण यांनी कराराचा अंतिम मसुदा तयार केला. तो सभेस हजर असलेल्या विदर्भाच्या नेत्यांना मान्य झाला आणि त्यावर सहया केल्या या करारातील तरतुदी पुढीलप्रमाणे

१. सध्याच्या मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील सलग मराठी भाषिक प्रदेशाचे मिळुन एक राज्य बनविण्यात यावे. या राज्याच्या कक्षेत आणि सीमेच्या आत कोठलेही अन्य राज्यांचे टापु असु नयेत. या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे नांव देणेत येईल व मुंबई शहर या राज्याची राजधानी राहील.

२. सर्व प्रकारच्या विकास योजनांसाठी आणि राज्यकारभारासाठी महाविदर्भ, मराठवाडा व उरलेला प्रदेश असे तीन घटक मानण्यात येतील.

३. एका राज्यसरकारच्या आवश्यक त्या सर्व गरजांची तरतुद करून सदरहु निरनिराळया घटकामध्ये खर्च करण्यासाठी लागणा-या पैशाची विभागणी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार करण्यात येईल. परंतु मराठवाडयाची मागासलेली परिस्थिती लक्षात घेऊन त्या विभागाची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी खास तरतुद करण्यात येईल. या बावतीत राज्य कायदेमंडळाला दरवर्षी अहवाल सादर करण्यात येईल.

४. राज्याच्या मंत्रिमंडळात त्या त्या घटकातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधीत्व मिळेल.

५. व्यावसायिक व शासकीय शिक्षण देणा-या अगर इतर खास शिक्षणाची सोय असलेल्या सर्व शिक्षण संस्थात प्रवेश मिळण्याच्या बावतीत प्रत्येक घटकाला लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या आणि पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यात येतील.

६. नव्या राज्यातील वरिष्ठ न्यायालयाचे (HighCourt) मुख्य पीठ मुंबई येथे राहिल व दुय्यम पीठ (खंडपीठ) नागपुर येथे राहिल. वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणुक करताना महाविदर्भच्या न्यायकारभारातील व वकिली व्यवसायातील लोकांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळेल याची काळजी घेण्यात येईल. आवश्यक ते फेरफार करून हे कलम मराठवाडयालाही लागु होईल.

७. सरकारी नोक-याच्या तसेच सरकार नियंत्रित उद्योगधंदयातील नोक-याच्या बावतीत प्रत्येक घटकातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार भरती करण्यात येईल.

८. राज्यकारभाराशी निरनिराळया घटकातील जनतेचे अधिकाअधिक सहकार्य मिळवण्याचे साधन म्हणुन विकेंद्रीकरण उपयुक्त आहे असा आमचा विश्वास आहे.

९. महाविदर्भाची राजधानी या नात्याने तेथील जनतेचे संबध अनेक वर्षापासुन नागपुरशी निगडीत झाले आहेत आणि त्यापासुन तेथील जनतेला निरनिराळया प्रकारचे फायदे मिळत आहेत याची जाणीव आम्हाला आहे. एका राज्याचा कारभार कार्यक्षमरीतीने चालवला जाईल, याची योग्य ती काळजी घेऊन हे सर्व फायदे कायम रहावेत अशी आमची इच्छा आहे. या कलमाची अमंलबजावणी करण्यासाठी योग्य ती पावले तज्ञाच्या सल्ल्यानुसार टाकण्यात येतील. वर्षातुन काही विशिष्ट काळासाठी सरकार अधिकृतपणे नागपूर येथे हलविण्यात येईल आणि राज्यकायदेमंडळाचे किमान एकतरी अधिवेशन दरवर्षी नागपूरात घेण्यात येईल.

१०. नव्या राज्यात सर्व सलग मराठी भाषक प्रदेशाचा अंतर्भाव होईल. अशा रीतीने नव्या शिरगणतीच्या आधारे खेडेगाव हा घटक मानुन जिल्हयाच्या सीमांची पुर्नरचना करण्यात येईल.[८]

या करारावर महाविदर्भाचे नेते श्री रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर,रा.कृ.पाटील, पु.का.देशमुख, शेषराव वनखेडे व पश्चिम महाराष्ट्राचे नेते श्री भाऊराव हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, देवकीनंदन नारायण आणि मराठवाडयाचे नेते श्री देविसिंग चव्हाण, श्री लक्ष्मणराव भाटकर, सौ.प्रभादेवी जकातदार इत्यादी नेत्यांनी सहया केल्या. शंकरराव देव व स्वामी रामानंद तीर्थ यांनी चर्चेत भाग घेतला होता पण करारावर सहया केले नाहीत. अकोला करारावर सही करणारे श्री. पुनमचंद रांका व ब्रिजलाल बियाणी मात्र बैठकीला नव्हते व त्यांच्या करारावर सहया पण नाहीतच. या करारला मराठवाडयातुन अनुकुल प्रतिसाद मिळाला, त्याचबरोबर महाराष्ट्रभर नागपूर कराराचे स्वागत झाले.

१ ऑक्टोबर १९५३ रोजी पोट्टी श्रीरामुलुच्या मृत्युनंतर पहिले आंध्र हे भाषिक राज्य स्थापन झाले. त्यामुळे इतर भाषिक राज्य निर्माण करण्याची मागणी तीव्र झाली. सरकारने फाजल अली कमिशन नेमले. आयोगाने आपल्या अहवालात वेगळया विदर्भाच्या मागणीला मान्यता दिली. या वेगळया विदर्भ राज्याबाबतच्या आयोगाच्या शिफारशीवर लोकमत आजमावुन घेण्याचा निर्णय कॉंग्रेस श्रेष्ठीनी घेतले. याबद्दल २१ ते २६ नोव्हेंबर हया कालावधीत मध्यप्रदेशाच्या विधानसभेत राज्यपुर्नरचना आयोगाच्या अहवालावर चर्चा झाली. विदर्भातील ४७ आमदारांनी आपल्याला, वेगळया महाराष्ट्रात जाण्याची इच्छा नसल्याचे सांगितले. याऊलट १९ आमदारांनी आपण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या बाजुचे असल्याचे सांगितले. विदर्भाचे वेगळे राज्य हवे म्हणण्याच्या मागणीला अर्थमंत्री ब्रिजलाल बियांणी, आरोग्यमंत्री मारोतराव कन्नमवार, एस.एस.कुलकर्णी, अकोटचे साकी नियाझी, गोंदियाचे मनोहरभाई पटेल नागपुरचे मदनगोपाल अग्रवाल, मंचरशा अवारी, एस.व्ही.सोनवणे, डी. झेड.पळसन्नावर, नाशिकराव तिरपुडे, नरेंद्र तिडके, काटोलचे शंकरराव गेडम, कीर्तिमंतराव, भुजंगराव इ. लोकांनी पाठींबा दिला. विदर्भासह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला विधानसभेत पाठिंबा जाहिर करणा-यांमध्ये पु.का. देशमुख, रा.कृ. पाटील अचलपूरचे डॉ.ए.जी.सोनार, दारव्हयाचे डी.एस.पाटील अमरावतीचे वीर वामनराव जोशी, वसंतराव नाईक आणि प्रभावती जकातदार हे दोन्ही उपमंत्री, डी.वाय.गोंदोकर इत्यादींचा समावेश होता. अशारीतीने वेगळया विदर्भाच्या मागणीच्या बाजुने जास्त संख्या झाली. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्याना मुंबई मिळणार नव्हती, त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रवादयांनी मुंबईसह व विदर्भ मिळुन महाराष्ट्र निर्माण व्हायला पाहिजे अशी मागणी केली. मुंबईसह महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढू लागला व आंदोलन अधिक तिव्र झाले. २१

नोव्हेंबरला फ्लोराफाउंटन येथील गोळीबारात १०६ लोक ठार झाले. परंतु मुंबई शिवाय महाराष्ट्र स्विकारायची तयारी मराठी जनतेची नव्हती. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, हीच मागणी होऊ लागली. परंतु २२ ऑक्टोबर १९५५ रोजी महाराष्ट्राच्या प्रांतिक कॉंग्रेसची बैठक झाली, त्यात विदर्भासह व्दैभाषिक राज्य दया असा ठराव झाला आणि संयुक्त महाराष्ट्र होत नसेल तर द्वैभाषिक मुंबईत तरी मुख्य मराठी भागात व-हाडचा समावेश करावा, या श्री वॅ. रामराव देशमुख याच्या पुर्वीच जाहीर झालेल्या मताला पुष्टी देणारे एक पत्रक श्री रामराव देशमुख,रा. कृ. पाटील व श्री मटकर यांनी प्रसिध्द केले. त्याचबरोबर प्र. का. देशमुख आणि गोपाळराव खेडकर या दोघा विदर्भाच्या नेत्यांनी "विदर्भाकरिता मुंबई सोडण्याची पाळी आली तरी ते मान्य करावे. मुंबई आज मिळवा विदर्भ आज ना उद्या संयुक्त महाराष्ट्रात निश्चितपणे येईल असा मला विश्वास आहे."[९] अशी भुमिका मांडली. अशा रीतीने या विदर्भातील नेत्यांना मुंबई महत्वाची वाटली.

यामुळे अखेर व्दिभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात येणार अशी खात्री झाली. विदर्भीय नेत्यांनीही व्दिभाषिक मुंबई राज्यात सामील होण्याची भूमिका घेतली, कारण सुरूवातीलाच रामराव देशमुखांनी संपुर्ण मराठी भाषिकांचे एक राज्य असावे असे म्हटले होते. त्यामुळे मुंबईसह व विदर्भ मिळुन हे व्दिभाषिक राज्य निर्माण झाले. पण त्याच्या विरोधात गुजरात व महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी असंतोष उफाळुन येत राहिला. त्यातच १९५७ साली झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्रात कॉंग्रेसचा दारूण पराभव झाला. त्यामुळे केंद्र सरकारने मुंबई व्दिभाषिक राज्याची विभागणी करून संयुक्त महाराष्ट्र व गुजराथ ही दोन राज्य निर्माण केली. अशा प्रकारे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. विदर्भवादी नेत्यांनी विदर्भाची मागणी तीव्रपणे केली नाही. नागपूर करारातील तरतुदीनुसार नागपूरला उपराजधानीचा दर्जा देण्यात आला आणि त्या करारातील तरतुदी १९५९ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या मार्गदर्शक तत्वात सामील करण्यात आल्या व विदर्भ हे संयुक्त महाराष्ट्रात राहिले.

**•विदर्भाचा भावनिक ऐक्य व विकासाचा प्रश्न :**

१९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर नव्या सरकारपुढे अनेक प्रश्न होते. महाराष्ट्र स्थापण होण्यापुर्वीच यशवंतराव चव्हाणांनी ५ जानेवारी १९६० रोजी सांगली येथे केलेल्या भाषणात महाराष्ट्रापुढील प्रश्न कोणते आहेत ते जनतेसमोर मांडले. ते म्हणाले की, "आज आमच्या समोरचे प्रश्न तीन

प्रकारचे आहेत काही राजकीय, काही सामाजिक, काही आर्थिक प्रश्न आहेत".[१०] हे सांगुन ते पुढे म्हणतात, "विदर्भ आणि मराठवाडा यांना भावनेने उर्वरित महाराष्ट्राशी एकरूप होता येईल असे वातावरण निर्माण करावयाचे आहे".[११] संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी झाल्यानंतर एस.एम.जोशी यांनी "विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील जनतेत भावनिक ऐक्य रूजणे गरजेचे आहे".[१२] असे म्हटले, कारण पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा हे तीन भाग प्रथमच राजकीय दृष्टया एकत्रित येत होते. त्यात मराठवाडा मागासलेला होता आणि विदर्भात स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारा प्रभावी दबावगट होता. या सर्वांच्या मनात भावनिक ऐक्य निर्माण करणे गरजेचे होते, ती पश्चिम महाराष्ट्रातील नेत्याची जबाबदारी होती. हे भावनिक ऐक्य स्थापन करण्यासाठी आर्थिक विकास घडवून आणणे महत्वाचे होते, तशी आश्वासने वेळोवेळी दिली गेली. मात्र प्रत्यक्षात विकासाच्या यंत्रणा राबविण्यात आल्या नाहीत.

त्याचबरोबर विदर्भाची मागणी करणारे नेतृत्वही येथे सातत्यपूर्ण राहीले नाही. बापुजी अणे यांच्यानंतर त्याचे अनुयायी टी.जी. देशमुख हे कट्टर विदर्भवादी बनले, परंतु पुढे ते कॉंग्रेसमध्ये गेले. तरीही त्यांनी आपली स्वतंत्र विदर्भवादी भूमिका सोडली नाही. दैनिक 'विदर्भ आंदोलन' त्यांनी चालविले. नागपूरच्या स्थानिक राजकारणात 'नागविदर्भ आंदोलन समिती' कायम करून त्यांनी महानगरपालिका निवडणुका लढविल्या, कॉंग्रेसमध्ये ते आमदार झाले, काही काळ त्यांनी राज्यमंत्रीपद भुषविले. एवढे करूनही ते अखेरपर्यंत विदर्भराज्यवादी नेते राहीले. त्याच्या स्वंतत्र राज्य आंदोलनातील प्रवेशामुळे विदर्भवादी चळवळीच्या आशा पल्लवित झाल्या.

त्यानंतर जंबुवतराव धोटे हे विदर्भवादी नेते १९७१ च्या निवडणुकीत नागपुर लोकसभा मतदार संघातुन परभुत झाले. कारण इंदिरा कॉंग्रेसला विरोध करणारे ते एकटेच नेते होते. परंतु त्यांनी १९७७-८० च्या दरम्यान कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे १९८४ मध्ये ते कॉंग्रेसबाहेर पडले. अमरावती व नागपूर या दोनही लोकसभा मतदार संघातून ते पराभुत झाले. त्यामुळे जंबुवंतराव धोटे यांचे राजकारण याच ठिकाणी संपले, त्यांची राजकीय विश्वासार्हता लयास गेली. त्यानंतर स्वंतत्र विदर्भ राज्यवादी नेते म्हणुन वसंतराव साठे यांचे नेतृत्व पुढे आले. ते प्रजासमाजवादी पक्षाचे नेते होते. त्यांचा अनेकवेळा पराभव झाला. शेवटी त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. अकोला येथील पोटनिवडणुकीत ते विजयी झाले. पुढे त्यांनी खासदार व मंत्री म्हणुन कार्य केले. परंतु त्यांनी स्वंतत्र विदर्भ राज्याची कॉंग्रेसश्रेष्ठींकडे मागणी केली नाही. विदर्भात

आज रणजित देशमुख आणि विलास मुत्तेमवार हे विदर्भाच्या चळवळीत आघाडीवर आहेत. विलास मुत्तेमवार हे केंद्रात व रणजित देशमुख हे राज्यात मंत्रीपदावर असताना त्यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली नाही आणि मंत्रीपद गेल्यावर ते स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करीत आहेत. बुलढाण्याचे मुकुल वासनिक आज केंद्रात मंत्री आहेत. परंतु विदर्भ राज्याबद्दल काहीच बोलत नाहीत.

सध्या जंबुवंतराव धोटे 'विदर्भ राज्य संघर्ष समिती'च्या माध्यमातुन स्वतंत्र विदर्भाची मागणी करत आहेत. त्यांनी विदर्भाचे आंदोलन कार्यरत ठेवले आहेत. तेलंगणाच्या मुद्दयावर जेव्हा केंद्राने सकारात्मक इशारा दिला त्यावेळी विदर्भातील जनआंदोलन पेटले. तेव्हा विदर्भातील सर्व ग्रामस्थांनी २६ जानेवारी २०१० ला नागपूरसह विदर्भ राज्य व्हावे असा एक ओळीचा ठराव संमत करून समितीकडे पाठवावा असे आव्हान जंबुवंतराव धोटे, विलास मुत्तेमवार आणि भारतीय बहुजन महासंघाचे रणजित मेश्राम यांनी केले. अशा रीतीने आज विदर्भ राज्यवादी नेते कार्यरत आहेत. परंतु विदर्भामध्ये विकासाचा असमतोल दुर व्हावा आणि अनुशेष दुर करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी विदर्भातील मंत्री, आमदार, खासदार यापैकी कोणीही उपोषणाला बसले नाही किंवा ज्याप्रमाणे स्वतंत्र तेलगंणा राज्यनिर्मितीसाठी त्यांच्या संघर्ष समितीने सर्वांना राजीनामे द्यायला लावले, तसे विदर्भाच्या नेत्यांनी कधी केलेले दिसत नाही. त्यामुळे आज विदर्भाचा विकास खुंटीत झालेला दिसून येतो, कारण १९५६ साली घटनेच्या ३७१(२) कलमामध्ये मागासलेला विदर्भ व मराठवाडा प्रदेशासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याची तरतुद संविधानात करण्यात आली. १ मे १९६० रोजी विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश होताना घटनेच्या ३७१(२) कलमाच्या अंमलबजावणीची ग्वाही देण्यात आली. महाराष्ट्राच्या सर्व विभागाचा समतोल विकास होईल. शासकीय नोक-यात व शिक्षणाबाबत लोकसंख्येच्या प्रमाणात संधी देण्यात येईल. अशा प्रकारची तरतुद नागपूर करारात करण्यात आली. हा करार होऊन ५० वर्षे पुर्ण झाली असली तरी महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकात विदर्भाच्या वाटयाला नागपूर करारानुसार करावयाच्या तरतुदीकडे पूर्ण कानाडोळा करण्यात आला आहे. हे अनेक आयोगांच्या आणि समितीच्या अहवालामधुन सिध्द झाले आहे. कारण प्रादेशिक समतोलाचा अभ्यास करण्यासाठी वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती १९८३ साली वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९९४ मध्ये सादर केला त्या अहवालात विदर्भाचा अनुशेष शोधण्याबरोबरच प्रदेशाच्या विकासासाठी समितीने विविध सुचना केल्या. उत्पन्नाच्या ८.५ टक्के रक्कम ही

अनुशेप भरून काढण्यासाठी खर्च करावी, ही समितीची एक मुख्य सुचना होती. परंतु समितीने केलेल्या सुचनांची अंमलबजावणी केली गेली नाही.या समितीच्या अभ्यासपद्धतीवर टिका करताना डॉ.द.ना. धनागरे असे म्हणतात की, "या समितीने असमतोल मोजण्याची जी अभ्यासपध्दती निवडली त्यात विकासाचा निर्देशांक ठरविण्यासाठी तालुका हे युनिट घेतले आणि त्यावरून त्यांनी तो निष्कर्ष काढला तो म्हणजे विकासाचा अनुशेष जसा विदर्भ-मराठवाडयातील जिल्हयामध्ये आहे तसाच तो पश्चिम महाराष्ट्रातही आहे म्हणजे कृष्णा नदीच्या पाण्यामुळे पश्चिम सांगली जिल्हयातील तालुके समृध्द झाले तरी जत, कवठेमंहाकाळ सारखे पर्जन्य छायेतील तालुके विकासापासुन वंचित राहिलेत. तेव्हा विकासाचा अनुशेष तालुकावार काढला जावा.ह्या अभ्यासपध्दतीमुळे समितीसमोर असलेल्या प्रादेशिक असमतोलाच्या विषयातील प्रदेश या संकल्पनेला पूर्णत: हरताळ फासला गेला".[13] या संदर्भात डॉ.रमाकांत पितळे यांनी असे म्हटले आहे की १९७० पासुन विदर्भाची महाराष्ट्रात पध्दतशीरपणे आर्थिक गळचेपी झाली आहे. कारण आज महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाचे किंवा पक्षाचे सरकार आले तरी विकासातील भेदभाव व विषमता वाढतच आहे.

अनुशेषाची चर्चा मोठया प्रमाणात होऊ लागल्यावर अखेर १ मे १९९४ रोजी राज्यघटनेच्या ३७१(२) कलमानुसार तीन विकास मंडळे स्थापन केली गेली.त्याचे काम राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालामार्फत पाहावे अशी घटनात्मक तरतुद आहे.त्यानुसार विदर्भ विकास मंडळ आज अस्तित्वात असुन ते १५ वर्षापासून कार्यरत आहे.पण विकासातील असमतोल कमी होण्याऐवजी वाढला आहे.त्यामुळे प्रादेशिक असमतोल अभ्यासण्यासाठी पंतप्रधानानी २मार्च २००४ रोजी योजना आयोगाच्या प्रमुख सल्लागार श्रीमती आदर्श मिसा हयांच्या अध्यक्षतेखाली एक सत्यशोधन समिती नेमली. या समितीने मे २००६ ला २४४ पानांचा अहवाल सादर केला. या अहवालात असे म्हटले आहे की, "समितीने विदर्भाच्या अविकासाचे मुख्य कारण शोधुन काढता असे आढळले, की, विदर्भातील लोकांकडेदुर्लक्ष करण्याचा प्रयत्न जाणीवपुर्वक करण्यात येत आहे.तसेच विकासाचे मुख्य कारण लोकांचे मानसिक दु:ख आहे. विकासासाठी करण्यात आलेला खर्च आणि प्रत्यक्ष वाटप यामध्ये तफावत दिसुन येते. वरील सर्व दोष दुर करण्यासाठी विदर्भ वैधानिक विकास मंडळाने काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत.१) शासकीय योजनांच्या सहाय्याने कालव्यादवारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. २) ९ मार्च १९९४ रोजीच्या राष्ट्रपतीनी दिलेल्या

सुचनांची परिणामकारकरित्या अंमलवजावणी करणे आवश्यक आहे. ३) विकासात्मक समता निर्माण करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे".[१४]

कंट्रोलर अॅंड ऑडिटर जनरल (CAG) च्या २००६-०७ च्या अहवालानुसार' "विदर्भाची राहिलेली अनुशेप रक्कम पश्चिम महाराष्ट्र व राज्याच्या अन्य भागाकडे वळविली जात आहे. राज्यपालाच्या आदेशाचे पालन होत नसल्यामुळे प्रादेशिक असमतोल वाढत आहे कारण विदर्भाच्या विकासासाठी असलेल्या ७० टक्के निधी इतरत्र वापरला जातो".[१५] त्याचवरोवर डॉ.पी.सी. अलेक्झांडर, मोहमद फजल, एस.एम कृष्णा व एस.सी.जमीर या चार ही राज्यपालांच्या काळात त्याच्या निर्देशाचे उल्लघंन झाल्याचे नोंदवले गेले आहे.

या वरील सर्व अहवालामधुन राज्यपालाच्या निर्देशाचे सरकार पालन करीत नाही व विदर्भातील पैसा पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला जातो असे स्पष्टपणे नमुद केलेले दिसुन येते. त्यामुळे विकासातील असमतोल कमी होण्याऐवजी वाढला आहे. विदर्भाचा पश्चिम महाराष्ट्रावरोवरच समतोल विकास व्हावा आणि तो होई ल असा विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न नागपूर कराराव्दारे झाला. नागपूर कराराव्दारे नागपूर शहराला उपराजधानीचा दर्जा दिला गेला.त्यानुसार वर्षातुन एक अधिवेशन नागपुरात भरवण्यात येते, प्रत्यक्षात मात्र विदर्भासाठी काहीच निर्णय होत नाहीत.

आज विदर्भापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये कुपोषण, शेतक-याची आत्महत्या, नक्षलवाद, शिक्षण, आरोग्य, आर्थिक मागासलेपणा इत्यादी समस्या आहेत. विदर्भाच्या समस्यांचे वर्णन करताना श्री.द्वादशीवार लिहितात, "गेल्या पाच वर्षात विदर्भातील शेतक-यांनी हजारोंच्या संख्येने केलेल्या आत्महत्या, अमरावती विभागातील आदिवासी मुलांच्या वाटयाला कुपोषणामुळे तेवढयाच मोठया संख्येने आलेले मरण, गडचिरोली जिल्हयात साडेसातशेवर आदिवासींची मागणी, दिडशेहुन अधिक पोलिसांची नक्षलवादयांनी केलेली हत्या आणि वर्षाकाठी शेकडो कोटी रूपयांनी वाढत जाणारा विकासाचा अनुशेष, ही सारी महाराष्ट्र राज्य व त्याच्या सरकारकडुन विदर्भाला गेल्या ५० वर्षात मिळालेली देणगी आहे".[१६]अशा समस्या विदर्भात असुन, त्यासंबधी कोणत्या प्रकारच्या उपाय योजना केल्या गेल्या पाहिजेत याचा विचार होत नाही. म्हणून वेगळया विदर्भाची मागणी विदर्भाचे नेते व जनता करीत आहे. विदर्भ हा मुळात अविकसित भाग होता. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर त्याचा विकास होईल, असे वाटले, परंतु सातत्याने त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. आजची परिस्थिती फार विकट वनली आहे. कारण "अमरावती

जिल्यातील मेळघाट भागातच नव्हे तर नागपुर साख्या उपराजधानीचा दर्जा असलेल्या शहरात ३२ टक्के बालके कुपोषित आहेत. बालमृत्युदरसुध्दा (0 ते ५ वयोगट) १७ टक्कयांवरून ३१ टक्कयापर्यंत वाढला आहे. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अहवालात विदर्भ नागपुरच्या दुर्गम भागात पोषक आहार पुरवण्यासाठी आदेश दिले जावेत, अशी मागणी केली जाते, आदेश होतात, मात्र पोषक आहार योजनेचा लाभ गरजु बालकांपर्यंत पोहोचत नाही. परिणामत: शहरातील २० ते ४० टक्के बालकांचे वजन सरासरीपेक्षा अडीच किलो कमी असुन सर्वेक्षणानंतर ३२ टक्के बालके कुपोषित असल्याचे आढळले"[१७] त्यामुळे कुपोषण ही विदर्भाची गंभीर समस्या आहे.

विदर्भातील सिंचनाची अवस्था पाहिली तर १५० हुन अधिक सिंचन योजना निधी अभावी अपुर्ण अवस्थेत वर्षानुवर्षे पडुन आहेत कारण वर्धा,वैनगंगा, पैनगंगा व प्राणहिता या विदर्भातुन बारमाही वाहणा-या नदया असुन यापैकी एकाही नदीवर मोठे धरण बांधून विदर्भाची सिंचनविषयक समस्या सोडविली गेलेली नाही. वीजनिर्मितीची केंद्रे विदर्भात असताना विदर्भातील शहरांमधुन ६ ते ९ तास आणि ग्रामीण भागात तर १० ते १४ तासांपर्यंत दररोज विजेचे भारनियमन केले जाते. अन्नधान्य आणि कापुस, भुईमूग, ऊस या नगदी पिकांच्या किंमती मध्ये किंवा आयातनिर्याती बाबतीत निश्चित धोरण नसल्यामुळे विदर्भातील शेतक-याच्या शेतमालाला हमीभाव मिळेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडलेले शेतकरी आत्महत्या करीत आहेत. विदर्भातील शेतक-यांनी हजारोच्या संख्येने २00१-२0१0 या दशकात आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाना आर्थिक मदत देण्यासाठी आणि सिंचन योजना पुर्ण करण्यासाठी केंद्रशासनाकडुन २२00 कोटी रूपयाचे सहाय्य महाराष्ट्र राज्याला मिळाले पण अशा कल्याणकारी आर्थिक तरतुदी लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाहीत.

अशा रीतीने विदर्भामध्ये सध्या अनेक समस्या आहेत. त्यामुळे वेगळया विदर्भाची मागणी तीव्र होताना दिसते. डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.श्री.आ.देशपांडे यांच्यासारखे अर्थतज्ञ ही विदर्भ राज्याची मागणी सातत्याने करीत आहेत. २0 जानेवारी २0१0 रोजी विदर्भवाद्यांनी जाहीर केलेला विदर्भ बंद शंभर टक्के यशस्वी करून वेगळया विदर्भाच्या मागणी मागे त्या भागातील लोकमत ठामपणे उभे असल्याची खात्री सा-या देशाला करवुन दिली. तेलंगणाच्या मागणी बरोबरच विदर्भाची मागणी तीव्र झाली कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत साठे यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, "रम, रमा आणि रमीत रमलेल्या नेत्यांवरील विदर्भातील

जनतेचा विश्वास पुरता उडाला आहे".[१८] कारण संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रीय जनतेत भावनिक ऐक्य निर्माण व्हावयास हवे होते, ते आजही झाले नाही. त्याचे उदाहरण देताना श्री. देवेंद्र गावंडे लिहितात, "शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांचे अलीकडेच प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र देशा' या छायांकित पुस्तकात महाराष्ट्रातील अनेक ऐतिहासिक वास्तु, किल्ले, पंढरपुरची वारी यांची हवाई चित्रे आहेत, परंतु यातुन विदर्भ जवळजवळ बेपत्ता आहे. बुलढाण्याचे लोणार सरोवर व सिंदखेड राजातील 'जिजाऊची समाधी' चा अपवाद वगळता विदर्भातील कोणताही स्थळाची नोंद या पुस्तकात घेण्यात आली नाही".[१९] यावरून विदर्भ महाराष्ट्रात नाही असेच त्याचे मत कोणाचेही बनेल.

ते पुढे असेही लिहितात, "केवळ राज्यालाच नाहीतर संपुर्ण देशाला दिशा देणारे संत, महात्मे, समाजसेवक, साहित्यिक, राजकारणी विदर्भाने दिले आहेत. या सा-यांनी राज्याच्या प्रगतीत भरच टाकली व मराठी माणसाच्या मनात स्थान निर्माण केले. तरीही राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध राजकीय पक्षांनी मुंबईत ज्या मान्यवरांचा सत्कार केला, त्यात एकाही वैदर्भीयाचा समावेश होऊ नये याचे अनेकांना आश्चय वाटले, अनेकांना दुख:ही झाले".[२०] असे उदाहरण देऊन श्री. गावंडे यांनी भावनिक ऐक्य झाले नसल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे भावनिक ऐक्य निर्माण झाले नाही, विदर्भ आर्थिकदृष्टया मागास राहिला तर वेगळया विदर्भा ची मागणी कायमच राहणार आहे.

## ब) मुंबई

महाराष्ट्रात आज अनेक समस्या आहेत त्या समस्याचा विचार दोन पातळीवरून करावा लागतो एक मुंबई व परिसर आणि दुसरा उर्वरित महाराष्ट्र. मुंबई व परिसराचे प्रश्न उर्वरित महाराष्ट्रापेक्षा पुष्कळसे भिन्न आहेत. मुंबईला केवळ महाराष्ट्राची राजधानी एवढीच ओळख नाही तर ते जागतिक व्यापाराचे केंद्र आहे. भारताची आर्थिक राजधानी, मुख्य म्हणजे रोजगार निर्मितीची क्षमता असणारे सर्वात मोठे शहर, बॉलीवूडचे केंद्र अशी वैविध्यपूर्ण ओळख मुंबई शहराला आहे. परंतु अलीकडे मुंबई पुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी शेकडो लोकांचा प्राण गेला. तरीही आज काही राजकीय नेते मुंबई केंद्रप्रदेश व्हावा अशी मागणी करतात. तर दुसरीकडे मुंबईमध्ये कामासाठी परप्रांतीयांचे लोंढे येत

आहेत, त्यामुळे मुंबईत भुमीपुत्रांच्या रोजगारचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातुन मराठी-अमराठी संघर्ष निर्माण झाला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

मुंबई ही सात बेटावर वसली आहे. १६६१ पर्यंत येथे सम्राट अशोक, सातवाहन, शिलाहार त्यानंतर वीवरांजा इ. साम्राज्याच्या वर्चस्वाखाली मुंबई राहिली. १६६१ ला इंग्लंडचा राजा चार्ल्स दुसरा याला हुंडयात मुंबई हे बेट पोर्तुगिजांनी आंदण म्हणुन दिले. या राजाने पोर्तुगिज राज्याच्या मुलीशी लग्न केल्यामुळे त्यांनी ही भेट दिली. पुढे ईस्ट इंडिया कंपनीने हे बेट राजाकडुन १६६८ मध्ये दहा पौंडाच्या वार्षिक भाडयाने आपल्या ताव्यात घेतले. त्यानंतर ब्रिटीशांनीच मुंबईचा खऱ्या अर्थाने विकास केला. १६८७ साली ईस्ट इंडिया कंपनीने आपले कार्यालय सुरतेहून मुंबईला हलविले. त्यांच्याबरोबर गुजराती उद्योगपती व व्यापारी वर्गही मुंबईत आला. तेव्हापासून मुंबईमध्ये परप्रांतीय लोक येण्यास सुरवात झाली. ब्रिटीशांच्या या निर्णयामुळे मुंबईची लोकसंख्या वाढली. १६६१ मध्ये दहा हजार असलेली लोकसंख्या १६७५ मध्ये साठ हजारांवर जाऊन पोहचली. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे हे मुख्यालय पुढे बॉम्बे प्रेसिडेन्सीची राजधानी म्हणून कायम राहिली. ब्रिटीशांच्या ताव्यात हे शहर गेल्यानंतर त्यांनी त्याची सुव्यवस्थित रचना केली. अतिशय कलात्मक अशा इमारती उभारल्या. १८५३ साली अशियातील पहीला लोहमार्ग मुंबई ते ठाणे, तयार करण्यात आला. अमेरिकेचे नागरी युद्ध सुरू असताना मुंबई जगातील कापड व्यवहाराचे एक प्रमुख केंद्र बनली. सुएझ कालव्याच्या निर्मितीनंतर मुंबई हे अरबी समुद्रातील प्रमुख बंदर बनले. नतंरच्या ३0 वर्षामध्ये मुंबई शहराची भरभराट झाली. १९0६ च्या सुमारास शहराची लोकसंख्या ही १0 लाखापर्यंत पोहचली, कारण कामासाठी व व्यापारासाठी गजराथी, पारशी व अनेक उत्तर भारतीय व दक्षिणात्य लोक मुंबईत येऊन आपले काम करू लागले. त्यामुळे लेकसंख्येच्या दृष्टीने मुंबई हे कोलकत्या खालोखाल दुसरे मोठे शहर बनले.

मुंबई हे ब्रिटीशांच्या विरोधात भारतीय चळवळीचे प्रमुक केंद्र होते. महात्मा गांधीनी भारत छोडो आदोंलन हे मुंबई च्या गवालिया टॅक (आताचे आझाद मैदान) येथून सुरू केले होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना करण्याची मागणीपुढे आली. तेव्हां मुंबईमध्ये परप्रातीयांची संख्या निम्म्यापेक्षा जास्त असल्यामुळे मुंबई हे स्वतंत्र राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश करावे असे मनसुबे त्यावेळच्या काही राज्यकर्त्यानी मांडले. महाराष्ट्रातील जनता मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करू लागले. २१

नोव्हेंबर १९५५ रोजी जवळजवळ पाच ते सहा लाख कामगारांनी लाक्षणिक संप केले. मोर्चा काढण्यात आले त्यावर मोरारजी देसाई यांच्या आदेशानुसार गोळीबार करण्यात आले. त्यामुळे मराठी जनतेच्या भावनांनी तीव्र स्वरूप धारण केले. परंतु फाजल अली कमिशनने महाराष्ट्रासाठी विदर्भाचे स्वतंत्र राज्य सुचवून, गुजराथी प्रदेशासह मराठवाड्यासह मुंबई व्दैभाषिक राज्याची शिफारस केली. त्यानुसार १९५६ साली गुजरात व मराठी दोन्ही भाषिकांचा मिळुन मुंबई हे द्विभाषीक राज्य बनले. पण सरकारच्या या धोरणामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट निर्माण झाली. अनेक ठिकाणी सरकारच्या विरोधात निदर्शने, सभा झाल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते व्दिभाषिक राज्य स्विकारण्यास तयार नव्हते. त्यानंतर १९५७ ला मुंबई असेंब्लीची निवडणुक झाली. त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती व इतर पक्ष एकत्र येऊन निवडणुक लढविली. व्दैभाषिक राज्याच्या महाराष्ट्रातील १३३ जागेसाठी कॉंग्रेस व संयुक्त महाराष्ट्र समिती यांच्यात सरळ लढत झाली. त्यात महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या कित्येक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. परंतु कॉंग्रेसचे गुजराथमध्ये जास्त उमेदवार निवडुन आल्यामुळे त्याचीच सत्ता प्रस्थापित झाली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रखर विरोध लक्षात घेऊन व १९६२ च्या निवडणूकीत पराभव स्विकारण्याची वेळ येईल या भितीने कॉंग्रसच्या राज्यकर्त्यांनी १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली.

**मुंबईतील मराठी – अमराठी भाषिकाचा प्रश्न :**

संयुक्त महाराष्ट्राची निर्मीती झाली परंतु मुंबईतील मराठी भाषिकांवरचा अन्याय काही थांबला नव्हता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात महाराष्ट्रीय अस्मिता विकास पावली. मराठी अस्मितेचा राजकीय आणि सांस्कृतीक विकास मुख्यत्वेकरून मुंबई मध्ये झाला. मुंबई कोणाची हा प्रश्न संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महत्वाचा मुद्दा होता आणि त्यातुनच मुंबईच्या मराठीपणाचा आग्रह धरण्याची बीजे रोवली गेली. कारण स्वातंत्र्यपुर्वकाळात मुंबई शहरामध्ये पारशी, गुजराथी, व्यापारी व उद्योजक, तसेच वेगवेगळया प्रांतामधुन काम करण्यासाठी कामगार मुंबईच्या आश्रयाला येत राहिले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्यावेळी जवळजवळ ५० टक्केपेक्षा जास्त अमराठी लोक मुंबईत रहात होते. तरीसुध्दा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठी अस्मिता सांगणा-या संयुक्त महाराष्ट्र परीषदेच्या कार्यास मरगळ आली. त्याचवेळी व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी 'मार्मिक'(१९६०) हे मासिक सुरू केले. त्यामध्ये मुंबईत नव्याने निर्माण होणा-या रोजगाराच्या संधीचा पुरेसा वाटा मराठी माणसाला मिळत नाही, दक्षिण भारताकडील लोक सगळया संधी घेतात, असाप्रकारचे सातत्याने लिखाण करण्यात आले. त्यास मुंबईतल्या मराठी भाषिक तरूणाकडुन मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांनी १८ ऑक्टोंबर १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना मराठी भाषिकांच्या हितसंबधाची जोपासना करण्यासाठी केली. सेनेने मुंबईतील भुमिपुत्रांना प्राधान्य मिळाले पाहिजे या भुमिकेतुन लोकसंघटना करण्यास सुरूवात केली आणि या मराठीपणाच्या प्रश्नाला हात घालुन शिवसेनेने मुंबईत आपला दबदबा निर्माण केला. याच दरम्यान दक्षिण भारतीयांनी उभारलेल्या हॉटेलमध्ये आणि सार्वजनिक आस्थापनामध्ये महत्वाच्या जागांवर दक्षिणात्याच्या होणा-या निवडीच्या विरोधात शिवसेनेने बिगरमराठी पाटयांची मोडतोड केली. दाक्षिणात्य व्यावसायिकांची दुकाने, संस्था फोडणे, लुटणे, बिगर मराठी अधिका-यांच्या विरोधात दंगली करणे असे कार्य क्रम केले. त्यामुळे मराठी लोंकामध्ये सेनेला अधिकाअधिक लोकप्रियता मिळाली. पण त्याचवेळी मराठी - अमराठी या संघर्षाची मुहुर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर आक्रमक भाषणे आणि लिखाण करून प्रत्येकवेळी शिवसेनेने भावनिक मुद्दयावर मराठीपणाला जीवंत ठेवले. त्यामुळे मराठी -अमराठी माणसांमध्ये संघर्ष वाढतच राहीला.

सामाजिक संघटना म्हणून उदयास आलेली शिवसेना दोन वर्षेच निवडणुकीपासून दुर राहिली. परंतू १९६७ ते ६८ पासून ठाणे व मुंबई महानगरपालिकांच्या निवडणूकीत शिवसेना उतरली आणि १९७० सालानंतर महाराष्ट्रातील निवडणूकीच्या राजकारणात नियमितपणे भाग घेऊ लागली. १९६७ पासून १९८७ पर्यंत प्रजा समाजवादी, कॉग्रेस, संघटना कॉग्रेस, पुरोगामी लोकशाही दल इत्यादी पक्षांना शिवसेनेने प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष सहकार्य केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे सहकार्य शिवसेनेला होते. त्यामुळे कुचेष्टेने लोक त्याला 'वसंतसेना' असे म्हणत. पुढे १९८५ साली महाराष्ट्राच्या विधानसभेत वसंतदादा पाटील यांनी "मुंबईला महाराष्ट्रापासून अलग करून केंद्रशासित करण्याचे कारस्थान आम्ही चालु देणार नाही"[२१] असे म्हटले. त्याचा फायदा महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शिवसेनेने करून घेऊन त्या वर्षी झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत विजय मिळवला व सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रात

शिवसेनेच्या विस्ताराला सुरूवात झाली. १९८६ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर शिवसेना व्यापून टाकण्याचा कार्यक्रम चालवला. पुढे १९८९ मध्ये केवळ आपल्या कार्यकर्त्यासाठीच नव्हे, तर सर्वसामान्य नागरीकापर्यंत आपला संदेश पोहचविण्यासाठी शिवसेना नेते बाळासाहेब ठाकरे यांनी 'सामना' हे दैनिक सुरू केले. त्यानंतर शिवसेना ही केवळ शहरी कनिष्ठ मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी संघटना राहीली नाही तर राज्यात तिचा दबदबा निर्माण होऊन सर्व विभागातील लोकांचा भक्कम आणि नैतिक पाठबळ तिला मिळू लागले. १९८९ नंतर शिवसेना राज्याच्या निवडणूकीच्या नकाशात ठळकपणे उठून दिसू लागली.

ह्या सर्व गोष्टी करीत असताना शिवसेनेने भाजपशी युती करून हिंदुत्ववादी विचारधारा धारण केली आणि हिंदूच्या धार्मिक भावना भडकवल्या जातील असा प्रचार सुरू करून त्या संतापाचे आणि द्वेषाचे मुस्लिमांना लक्ष्य बनविले. जेव्हा हिंदुत्वाची भूमिका अपुरी पडे, तेव्हा मराठी अस्मितेचा सर्रास वापर शिवसेना करू लागली. त्याच बरोबर औरंगाबाद विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी दलित विरोधी भुमिका शिवसेनेने घेतली. मुस्लिमांना शिवसेना आपले शत्रू समजते ते शत्रूत्व बहुधा मुस्लिम विरोधी दंगली व हिंसाचार यांच्यामधुन व्यक्त होत होते. त्याला शह देण्यासाठी हिंदूचे सण, उत्सव मोठया धुमधडाक्यात साजरे करून मुस्लिमाना हिंदूच्या वर्चस्वाची जाणीव करून दिली जाते. पंजाबमधील दहशतवाद्यांनी हिंदू लोकांना मारले म्हणून शिवसेनेने महाराष्ट्रातील शिख धर्माच्या लोकांवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. परंतु प्रत्यक्षात ते सुरू झाले नाही.[२२] तसेच भारत-पाकीस्तान क्रिकेट सामने खेळू देणार नाही असे जाहीर करून मैदानावरची धावपट्टी खणून काढली. १९९३ साली बांगलादेशी लोकांना शोधून काढून त्यांना हुसकावण्याची मोहिम राबविली आणि त्या मोहिमेला महाआरत्या असे नाव दिले.[२३] त्याचबरोबर पुणे येथील प्रसिद्ध पाकीस्तानी गझल गायक गुलाम अली यांचा संगीताचा कार्यक्रम उधळण्याचा प्रयत्न केला.[२४] एकूणच मुंबई तील मराठी भाषिकांचा पाठींबा मिळवत असतानाच शिवसेनेने हिंदूत्ववादाच्या आधारे आपला पाया विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिपाक म्हणूनच १९९५ च्या निवडणूकीत त्यांना सत्ता मिळवणे सुलभ झाले.

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने जो जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात मराठी माणसाला नोक-यामध्ये ८० टक्के जागा देण्यासाठी प्रयत्न करणे, मराठी माणसाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देणे. बेकार मराठी तरूणाना उद्योगधंदे, व्यापार, नोक-या मिळतील असा प्रयत्न करणे इत्यादी कार्ये सत्तेवर आल्यानंतर करू असे जाहीर आश्वासन दिले. बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या भाषणांनी लोकांच्या अपेक्षा

वाढवण्याचे आणि वेगवेगळया प्रकारे त्यांच्या भावना भडकवण्याचे कार्य केले. ते निवडणूकीच्या प्रचारात, "मी हे सारे कोणासाठी करतो आहे? . . तुमच्याचसाठी नाही काय ? . . मला फक्त तुमचे आर्शिवाद हवेत दुसरे काही नको. . विचार करा मी एक संन्यासी आहे. तुम्ही तुमची मते मला दिली नाहीत तर माझे काहीच विघडणार नाही. मग तुम्ही तुमच्या नशिवात असेल त भोगा"[२५] अशारीतीने ते लोकांना भावनिकदृष्टया भडकवू लागले. लोकांच्या वाढत्या पाठींब्यामुळेच १९९५ च्या निवडणूकीत शिवसेना ७३ जागा जिंकून भाजप व अपक्ष आमदाराच्या पाठीब्यांवर महाराष्ट्रात सत्तेवर आली. त्यानंतर शिवसेनेने प्रत्यक्ष कृतीला महत्व दिले बाळासाहेव ठाकरेंच्या भावनिक व आक्रमक भाषणाने व थेट किंवा धडक कृती कार्य क्रमामुळे शिवसेना महाराष्ट्रभर पसरू लागली. परंतु १९९९ विधानसभा निवडणूकीत शिवसेनेला सत्तेपासून दूर व्हावे लागले. त्यामुळे त्यांचा धडक कृती कार्यक्रम थंडावला. २००२ सालच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये शिवसेनेने मराठी अस्मितेचा मुद्दा पुन्हा पुढे आणला गेला. आम्ही मुंबईकर असे आवाहन करून मुंवईत स्थानिक झाल्ल्या विगर मराठी नागरीकांना चुचकारण्याचा प्रयत्न शिवसेनेने केला. शिवसेनेने मराठी अस्मितेच्या भावनिकतेचा वारंवार फायदा घेतला आहे, कित्येक वेळा त्यास हिंसक वळणही लागले. त्यामुळे शिवसेना वदनाम होत राहीली, तरीही त्याचा मराठी अस्मितेचा पगडा कायम राहीला. शिवसेनेच्या कार्याबद्दल डॉ. सुहास पळशीकर म्हणतात, "मुंबई महाराष्ट्राची आहे म्हणुन मुंबईवर मराठी भाषेचा, संस्कृतीचा आणि मराठी भाषिकाचा अधिकार आहे ही भावना मराठी माणसाच्या मनात रूजविण्याचा यशस्वी प्रयत्न शिवसेनेने केला. शिवसेनेच्या या आवाहनात प्रखर प्रादेशिकतेला अनेक बाजू आहेत मुंबईतील मराठी माणसाच्या अस्मितेची वारंवार आठवण करून देत असताना शिवसेनेने प्रखर राष्ट्रवाद जोपासला आहे"[२६] कारण शिवसेनेने सुरूवातीला मराठीपणा, मराठी अस्मिता नंतर हिंदुत्ववादी भुमिका घेऊन प्रादेशिक व राष्ट्रीय दोन्ही पातळीवर जाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

२००४ नंतर शिवसेनेपुढे फाटाफुटीचे आव्हान उभे राहिले त्यामध्ये नारायण राणे यांनी अकरा आमदारांसह पक्ष सोडून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला, तर राज ठाकरे यांनी स्वतंत्रपणे 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'ची स्थापना केली. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाला आव्हान मिळाले. अशारीतीने ठाकरे घराण्यातील राज व उद्धवचा वाद उफाळून आला. त्यामुळे शिवसेनेची घुसमट वाढत आहे. हिंदुत्वाचा जोर ओसरला आहे आणि मराठी अस्मितेचा भावनिक मुद्दा राज ठाकरे मांडत असल्यामुळे शिवसेनेचे भावनिक राजकारण संपलेले

दिसत आहे. राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेरपडून ९ मार्च २००६ रोजी 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'ची स्थापना केली. आज मनसेने मराठीवादाचा मुद्दा पुन्हा उपस्थित करून महाराष्ट्र राज्य, मराठी भाषा व मराठी माणूस यांच्या हितासाठीच हा पक्ष निर्माण केला आहे असे जाहीर केले. त्यातून मनसेची संकुचित व प्रादेशिक विचारधारा लक्षात येते. मनसे मराठीचा मुद्दा अंत्यत आक्रमकपणे मांडत आहे. राज ठाकरे यांच्या आक्रमक भाषणामुळे महाराष्ट्रातील तरूण वर्ग मनसेकडे वळतो आहे. राज ठाकरे परप्रांतीयाना मारण्याची भाषा करीत आहेत. २००८ साली मुंबईमध्ये रेल्वे बोर्डाच्या परीक्षा देण्यासाठी आलेल्या परप्रांतीय विद्यार्थ्यांवर मनसेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. त्यामुळे पुन्हा मराठी-अमराठी संघर्षाचा मुद्दा नव्याने पुढे आला आहे. मराठी माणसाच्या विकासासाठी मनसेने आदोंलन उभे केले आहे,हे सांगताना मराठी कोणाला म्हणावे? या संदर्भात "जी मुले मराठी आई-वडिलांच्या पोटी जन्माला आली आहे. ते तर मराठीच! पण त्याचबरोबर इतर भाषिकांमध्ये ही जे महाराष्ट्रात जन्माला आलेले आहेत, जे महाराष्ट्रावर प्रेम करतात आणि मराठी भाषा उत्तम बोलतात आणि महाराष्ट्रात राहतात त्या माणसाला मराठी माणूस म्हणावे"[२७] अशी भूमिका मनसेची आहे.

मुंबईत आज मराठी माणसापेक्षा किती तरी अधिक संख्येने गुजराती, सिंधी, आणि उत्तर भारतीय लोक विविध व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत. आज मुंबई आणि परिसरात ७५ टक्के लोकसंख्या अमराठी भाषिकांची आहे. दैंनदिन सेवाक्षेत्रात मराठी माणसाला मोठी संधी होती. परंतु फुलवाला, पेपरवाला, दुधवाला, सफाईवाला, प्लंबर, इलेक्ट्रीकल्स, इस्त्रीवाला इत्यादी क्षेत्रात अमराठी भाषिकांनी चांगलाच जम बसवला आहे. विशेषत: १९९० नंतर उत्तर भारतीयांनी मुंबई परिसरातील सर्वछोटे मोठे व्यवसाय आणि सेवा क्षेत्र काबीज केले. बांधकाम क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. अमराठी बिल्डरांची फार मोठी लॉबी मुंबई आणि परिसरात काम करत आहे. त्याच्याकडील मजुरही अमराठीच असतो. ही श्रीमंत लॉबी अमराठी अस्मितेसाठी काम करते. लहान मोठया सर्व अमराठी संस्थाना वेगवेगळया पध्दतीने मदत करून ती आपला सहकार्यतेचा पाया मजबूत करत आहे. त्याच बरोबर उत्तर भारतीय नेत्यांनी संस्थाचे जाळेच उभारले असून त्यातुनच त्यांची राजकीय ताकद वाढली आहे. अशा रीतीने आज उत्तर भारतीय लोकांचे मुंबईत वर्चस्व वाढले आहे.

मनसेने मराठीचा मुद्दा उचलल्यापासून दोन वर्षात लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणूका लढवल्या. त्या निमित्ताने मनसे आणि राज ठाकरे हे विविध आदोंलनद्वारे प्रसिद्धीच्या झोतात राहीले. मनसेने महाराष्ट्राच्या अस्मितेबद्दल आणि मराठी भाषेबद्दल अनेक मुद्दे पुढे आणले. दैनंदिन व्यवहारात मराठी वापरण्याचा आग्रह, दुकानांच्या /कार्यालयांच्या पाटया मराठीत लावण्याचा आग्रह, स्थलांतरीतावर राज्यात मर्यादा घालण्याची मागणी, शाळांमध्ये मराठी भाषा शिकवण्याचा आग्रह, महाराष्ट्रात नोकरी, व्यवसायामध्ये मराठी माणसाना प्राधान्य असले पाहीजे इत्यादी मुद्दे पुन्हा एकदा पुढे आणले. शिवाय मुंबईचा मुद्दाही पुढे आणला. नोकरी व्यवसायात स्थानिक भूमिपुत्रांना संधी मिळावी, त्यासाठी भुमिपुत्रांना ८० टक्के नोक-या मिळाल्या पाहिजेतच. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष प्रवेश घेण्यापासून नोकरीपर्यंत भुमिपुत्रांना संधी दयावी असा आग्रह राज ठाकरे धरतात. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात परप्रांतीयाचे स्थलांतर प्रचंड प्रमाणात होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातल्या मराठी माणसाला मुंबईमध्ये नोकरी मिळणे कठीण झाले आहे. मनसेने मराठी माणसाला संधी न देता महाराष्ट्रात परप्रांतीयाना घुसवण्याचे प्रयत्न जिथे जिथे सुरू होते, तेथे आंदोलन करून मराठी भाषिकांना न्याय मिळवुन देण्याची भूमिका घेतली आहे. त्यातून मराठी अमराठी संघर्ष पेटतो आहे.

मनसेच्या सर्व आंदोलनाला मोठया प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे लोकसभा व विधानसभा निवडणूकीत मराठी अस्मितचिा मुद्दा घेऊन राज ठाकरे यांनी मराठी भाषिकांना आपल्याकडे खेचण्यास सुरूवात केली. मनसेच्या सभांना गर्दी होऊ लागली. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत शिवसेनेचा विजय झाला. मात्र मनसेला जवळजवळ ४ लाखांवर मते मिळाली. लोकसभा निवडणूकीमध्ये राज ठाकरे यांनी आपले उमेदवार उभे केले व मराठी भाषिक भागात मोठयाप्रमाणात मते मिळविली, परंतु एकही जागा त्यांना मिळाली नाही. २००९ च्या विधानसभेच्या निवडणूकीत मात्र त्यांनी १३ जागेवर विजय मिळविला. त्यामुळे मराठी अस्मितेचा मुद्दयावर राज ठाकरे आपल्या पक्षाची वाटचाल करीत आहेत. त्यानंतर महाराष्ट्राच्या विधानसभेत शपथ मराठीतच घेतले पाहिजे, याचा आग्रह धरून न घेणा-या एका हिंदी भाषिक आमदाराला मनसेच्या नेत्यांनी मारहाण केली. त्यानंतर ३ फेब्रुवारी २००९ रोजी राज ठाकरे यांनी डोंबिवली येथे झालेल्या सभेत "मुंबई कोणाची यावरून गल्लीपासुन दिल्लीपर्यंत घुसळण सुरू असताना यापुढे परप्रांतीयाकडुन होणारे आक्रमण रोखण्यासाठी पक्ष, जात-भेद विसरून सगळयांनी मराठी भाषेची अभेद्य भिंत

उभी करावी"[२८] असे आवाहन केले. मनसेच्या मराठी अस्मितेच्या राजकारणामुळे आज मुंबई ही मराठी -अमराठी संघर्षाच्या विळख्यात अडकलेली आहे.

अशारीतीने शिवसेना व मनसे या दोन्ही पक्षांनी मराठी अस्मितेच्या मद्दयावर भाषिकवाद निर्माण करून हिंसक आंदोलन केले आहे. त्यामुळे भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. राज ठाकरेंनी निवडणूकीच्या काळात परप्रांतीयांविरूद्ध तीव्र आंदोलन छेडले. परंतु त्याचा विचार केल्यास यातून कुणासाठीच काही ठोस निष्पन्न झाल्याचे चित्र दिसून येत नाही. तर केवळ भाषिक, प्रांतिक कटुता निर्माण होण्यातच या आदोंलनाची परिणती झाली असे म्हणावे लागेल. शिवसेनेने मराठी माणसाच्या हक्कासाठीच्या आंदोलनापासून दुर जाऊन पक्षविस्ताराच्या दृष्टीने सर्वसमावेशक धोरण घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी सेनेचाच मराठी मुद्दा उचलला आणि 'सेना विरूद्ध सेना' संघर्ष निर्माण केला आहे. फरक एवढाच की संदर्भानुसार दक्षिण भारतीयाऐवजी आता उत्तर भारतीयांना लक्ष केले आहे. यामूळे मराठी -अमराठीचा संघर्ष वारंवार होत असून ते भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला धोकादायक आहे.

भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर स्वतंत्र राज्याच्या मागणीचा जोर कमी होईल असे अपेक्षीत होते. परंतु तसे न होता आज अनेक राज्यामध्ये प्रादेशिक व आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर स्वतंत्र राज्याची मागणी होत आहे. त्यामध्ये आंध्रप्रदेशातून तेलगंणा,पश्चिम बंगालमधून गोरखालॅड, गुजरातमधून सौराष्ट्र, बिहारमधून मिथिलाचंल, कर्नाटकातून कूर्ग, मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशमधून बुदेलखंड आणि महाराष्ट्रातून विदर्भ , कोकण इत्यादी अनेक राज्याची मागणी होत आहे. दुसरीकडे मुंबईमधील मराठी-अमराठीचा संघर्ष निर्माण होऊन अनेक आंदोलने झाली आहेत. कित्येक वेळा त्यास हिंसक वळणही लागले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील विदर्भाच्या आणि मुंबईच्या प्रश्नाने महाराष्ट्राच्या एकात्मतेला व पर्यायाने भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.

## संदर्भ सुची


१ . Ane, M.S., Memoradum Submited to the States Reorganization Comission, 1954, P.26

२ . महावळ किशोर, वेगळया विदर्भ राज्याची चळवळ दशा आणि दिशा, सुवर्ण महोत्सव विशेषांक, नवभारत, मे जुन २०१० पृ . २१

३ . वेडेकर दि . के . संयुक्त महाराष्ट्र, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९४७, पृ . १७८

४ . कित्ता, पृ . १७८ ते १७९

५ . पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०, पृ . १८

६ . कित्ता, पृ . २३

७ . पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०, पृ . ३७

८ . फडके य . दि ., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४८ ते जानेवारी १९५६, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००७, पृ . ९० ते १००

९ . कित्ता, पृ . १९०

१० . महाराष्ट्र टाईम्स, दिवाळी अंक, २००९, पृ . १८

११ . कित्ता, पृ . १८

१२ . पोटदुखे शांताराम, विदर्भाला सुखी करा, साधना, १४ ऑगस्ट २०१०, पृ . ३५

१३ . धनागरे द . ना ., विदर्भाला सुखी करा, साधना, १४ ऑगस्ट २०१०, पृ . ५१

१४ . खांदेवाले श्रीनिवास, विदर्भाला सुखी करा, साधना, १४ ऑगस्ट २०१०, पृ . २१ते२२

१५ . कित्ता, पृ . २२

१६ . द्वादशीवार सुरेश, विदर्भाला सुखी करा, साधना, १४ ऑगस्ट २०१०, पृ . ८

१७ . दै . सकाळ, पुणे, ३ ऑगस्ट २०१०

१८ . जामकर किशोर , दै . सकाळ, कोल्हापूर, २ जानेवारी २०१०

१९ . गावंडे देवेंद्र, विदर्भाला सुखी करा, साधना, १४ ऑगस्ट २०१० पृ . ६९

२० . कित्ता, पृ . ७०

२१ . पळशीकर सुहास, भारतातील प्रादेशिक पक्षाचे राजकारण, साधना प्रकाशन, पुणे, २००९, पृ . ७२

२२ . महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, ६ मार्च १९८८

२३ . लोकसत्ता, पुणे, २१ नोव्हेंबर १९९४

२४ . सण्डे टाईम्स ऑफ इंडिया, पुणे, ३ मे १९९८

२५ . सामना, पुणे, ४फेब्रुवारी १९९५

२६ . पळशीकर सुहास, भारतातील प्रादेशिक पक्षाचे राजकारण, साधना प्रकाशन, पुणे, २००९, पृ . ७२

२७ . http://www.manase.org/maharashtra.com.

२८ . http:// www.majhimarathi.wordpress.com.